पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **११/०३/२०२०** वेळ - दुपारी **१२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **११/०३/२०२०** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
४. मा.बाबर शर्मिला राजू
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६. मा.कोकणे संतोष अंकुश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.नंदकिशोर वाघ – प्र.प्रशासन अधिकारी ( झोनिपू ) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) धावडेवस्ती,भोसरी येथे भुयारी मार्ग बांधणेबाबत. – मा.कैलास बारणे , मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१२/०२/२०२० व २६/०२/२०२०** (कार्यपत्रिका क्रमांक **१४**) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

मा.कैलास बारणे , मा.वैशाली घोडेकर यांनी प्रस्तावित केलेनुसार भोसरी येथून जाणा-या पुणे-नाशिक महामार्गावर धावडेवस्ती येथे नागरिकांना ये-जा करणेसाठी भुयारी मार्ग बांधणेत यावा. सदरचा मार्ग नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्याने सदरबाबत मनपाचे बीआरटीस विभागाने त्वरीत कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **राजेंद्र किसनराव लांडगे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१४५/२०२०
दिनांक : ११/०३/२०२०



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.